**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३२६० / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सनी रावसाहेब पोवार | प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका | सहा. आयुक्त, (सामान्य प्रशासन) पिंपरी चिंचवड महानगरपालिका |

**( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २४.०५.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी ऑनलाईन पद्धतीने हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १९.१२.२०२३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी प्रसिद्ध केलेल्या जाहिरात क्र. १८४/२०२२ नुसार अर्ज केलेल्या लिपिक पदासाठी उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि. २७ व २८ मे २०२३ तसेच १७/०७/२०२३ रोजी घेण्यात आली होती यापैकी ज्या उमेदवारांनी १७/०७/२०२३ रोजी लिपिक पदासाठी परीक्षा दिली होती अश्या सर्व उमेदवारांच्या फक्त परिक्षा क्रमांकाची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती निरंक आहे, असे सांगितले. "

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०२.०१.२०२४ रोजीच्या पत्राने माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत सूचना असलेने माहिती उपलब्ध करून देता येणार नाही, असे कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन आदेश दि. २८.०२.२०२४ रोजी १० दिवसात माहिती देण्याबाबत आदेश दिले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्राने माहिती निरंक असल्याबाबत कळविले आहे. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०२.०१.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास उत्तर देताना नमूद केलेल्या शासन परिपत्रकाचा चुकीचा अर्थ काढून माहिती नाकारली होती. सदर शासन परिपत्रक माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागितलेली माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत आहे. याचा उद्देश अर्जदारास माहिती देण्याच्या प्रक्रियेला अडथळा आणणे किंवा माहिती नाकारणे असा नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर आदेश पारित केले आहे. प्रथम अपिलीय आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१९.०३.२०२४ रोजीच्या पत्राने माहिती निरंक असल्याबाबत कळविले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

जावक क्र. ३२६० / २०२४ / पुणे 10179/2025 दिनांक - 20/11/25